**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र.२ ची सरतपासणी शपथेवर सुरु</u>** -

मी, संतोष गोविंद परब, वय ४९ वर्षे, धंदा - शेती, रा. रांगणातुळसुली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की,

**<u>वादीतर्फे सौ. एन्. एस्. रांगणेकर/सावंत, वकील</u>** -

**१.** वादी-प्रतिवादींचे कुटुंब माझे माहितीचे आहे. त्यांचे दरम्यान ज्या जमिनींसंबंधी वाद सुरु आहेत त्या जमिनी माझे माहितीच्या आहेत. हिर्लोक व रांगणातुळसुली, ही गांवे एकमेकांना लागून आहेत, त्यांची सीमा एकच आहे. वादातीत जमीन माझे जमिनीला लागूनच आहे. वादातीत जमिनींचे सर्व्हे नंबर १४७/४ ते १४७/९ व सर्व्हे नंबर १४८ असे आहेत. सर्व्हे नंबर १४८ चा हिस्सा नंबर मला सांगता येणार नाही. सर्व्हे नंबर १४७ व सर्व्हे नंबर १४८ ला लागून मौजे रांगणातुळसुली येथील माझे मालकीचा सर्व्हे नंबर ५५ आहे. त्या सर्व मिळकती रांगणातुळसुली गांवाच्या सीमेलगत आहेत. वादातीत जमिनी वादी-प्रतिवादी अशा उभयतांच्या कब्जेभोग्यात आहेत. माझे जमिनीला लागून ज्या जमिनी आहेत, त्या जमिनींचा उपभोग वादी-प्रतिवादी असे दोघे घेतात. सर्व्हे नंबर १४८ चे हिस्सा नंबर ४ व ६ असे उपहिस्से आहेत.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास श्री. एन्. एम्. वैद्य, वकील</u>** -

**२.** हे म्हणणे खरे नाही की, रांगणातुळसुली व हिर्लोक या दोन्ही गांवा दरम्यानचे अंतर पाच किलोमीटर आहे. माझी सर्व शेती रांगणातुळसुली येथे आहे. रांगणातुळसुली व हिर्लोक या दोन्ही गांवांच्या मध्ये जी सीमा आहे त्या सीमेलगत रांगणातुळसुली गांवाच्या हद्दीत सरकारी आकारीपड जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या पलिकडे माझी जागा आहे. रांगणातुळसुली गांवात माझे दोन मिळकती आहेत. त्या मिळकतींचे ७/१२ उतारे मी आज हजर केलेले नाहीत. दावा मिळकतींना लागून माझी सर्व्हे नंबर ५५ ही जमीन आहे असे दर्शविणारा नकाशा सुध्दा मी सदरकामी हजर केलेला नाही.

**३.** मंदा शिवाजी कानडे, माझी पत्नी आहे. ती वादी शिवाजी कानडे याची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा जावई असल्यामुळे त्याचे सांगण्यावरुन सरतपासात नमूद केलेला मजकूर मी धांदात खोटेपणे सांगत आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ४ ते १७ व त्यांचे वकील गैरहजर</u>** - त्यांचेतर्फे उलटतपास नाही.

**फेरतपास** - नाही.

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**कुडाळ**
**दिनांक : १३ /०४ /२०१८**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**कुडाळ**
**दिनांक : १३ /०४ /२०१८**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**